# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १६२-२२ दिनांक - ०६/०६/२०२२

## गावठी कट्टा व ३ जिवंत काडतुसांसह दोन आरोपी अटकेत- पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०५/०६/२०२२ रोजी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दोन इसम विना परवाना व बेकायदेशिर रित्या गावठी कट्टा घेवुन येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने रात्री २०:३० वाजताचे सुमारास वलईपाडा, जिल्हा परीषद मराठी शाळा, संतोषभुवन, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर या ठिकाणी बातमीचे आधारे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली सापळा रचला असता संशईत नामे १) मनोज सिंह व २) विकास ठाकुर दोन्ही रा. संतोषभुवन, नालासोपारा (पु.), मुळ रा. राज्य-उत्तरप्रदेश यांना शिताफिने ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात १ गावठी कट्टा व ३ जिवंत काडतूस असा १०,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे येथे I गु.रजि.नं. ४९१/२०२२ भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम-३, २५ प्रमाणे दिनांक०५/०६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.